## अधिसुचना ११

उपविभागीय अधिकारी,
करवीर उपविभाग,कोल्हापूर
कार्यालय दि.  /०३/२०१९
२८|०४|२०१८

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३.

१) **एस.आर.क्रमांक.०२/२०१७** मौ.सांगवडेवाडी ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा पादर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्रक्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ ( यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनयमाचा कलम ३ च्या (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाध्या जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयांचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

२) आणि ज्याअर्थि उक्त अधिसुचनेनुसार समूचित शासन असलेल्या, कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन ( यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे ज्याचा निर्देश " **सार्वजनिक प्रयोजन** " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेली आहे आणि म्हणून उक्त अधिनियम कलम ११ च्या पोटकलम(१) तरतुदीन्वये या द्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमिनीचा उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

३) त्या अर्थि आता, असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाचा प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतिची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ ( यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे. ) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेख अद्यावतीकरण्याचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या ३ च्या पोट खंड (छ)अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी,करवीर विभाग,कोल्हापूर** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

### जमिनीचे वर्णन

**गावाचे नांव- मौजे. सांगवडेवाडी** ता.करवीर , जि.कोल्हापूर

| अ.क्र. | भुमापन किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हे.आर ) | दिशा ( चतु:सिमा ) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २७ पै | ०.२९ | २८ | सांगवडे हद्द | सांगवडे हद्द | सांगवडे हद्द |
| २ | २८ पै | ०.१३ | ३२ | २७ | २९ | सांगवडे हद्द |
| ३ | ३२ पै | ०.५२ | ३४ | २८ | ३३ | सांगवडे हद्द |
| ४ | ३४ पै | ०.३० | ३५ | ३२ | ३९ | सांगवडे हद्द |
| ५ | ३५ पै | ०.०८ | ३६ | ३४ | ३९ | सांगवडे हद्द |
| ६ | ३६ पै | ०.०१ | ३७ | ३५ | ३९ | सांगवडे हद्द |
| ७ | ३७ पै | ०.०२ | ३८ | ३६ | ३९ | ५० |
| ८ | ३८ पै | ०.११ | ४४ | ३७ | ३९ | ५० |
| ९ | ३९ पै | ०.२९ | ४० | ३३ | ५ | ३७ |
| १० | ४२ पै | ०.२४ | ४३ | ४१ | १ | ४४ |
| ११ | ४३ पै | ०.२२ | १ | ४२ | १ | ४४ |
| १२ | ४४ पै | ०.०२ | १ | ३८ | ४२ | ४५ |
| १३ | ४५ पै | ०.०२ | १ | ३८ | ४४ | ४६ |
| १४ | ४६ पै | ०.०१ | १ | ३८ | ४५ | ४७ |
| १५ | ७२ पै | ०.१३ | ७३ | ५४ | ४८ | ७० |
| १६ | ७३ पै | ०.३८ | ८६ | ७२ | १ | सांगवडे हद्द |
| १७ | ८६ पै | ०.०९ | ८८ | ७३ | १ | ८५ |
| १८ | ८७ पै | ०.०२ | ८८ | ८६ | १ | ८८ |
| १९ | ८८ पै | ०.०८ | ९० | ८६ | १ | ८५ |
| २० | ८९ पै | ०.१७ | रस्ता | ८८ | ९० | ८५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | ९० पै | ०.११ | ९७ | ८८ | ९१ | ८८ |
| २२ | ९१ पै | ०.१७ | ९७ | ८८ | ९२ | ९० |
| २३ | ९२ पै | ०.०९ | ९७ | ८८ | ९४ | ९१ |
| २४ | ९४ पै | ०.१४ | ९३ | ८५ | ९६ | ९२ |
| २५ | ९५ पै | ०.१० | ९४ | ८८ | ३६ | ९२ |
| २६ | ९८ पै | ०.०५ | ९९ | गावठाण | ९९ | सांगवडे हद्द |
| २७ | ९९ पै | ०.०३ | ११७ | ९८ | १०० | सांगवडे हद्द |
| २८ | १०० पै | ०.०३ | १२६ | गावठाण | १०१ | ९९ |
| २९ | १०१ पै | ०.०२ | १०३ | गावठाण | १०२ | १०० |
| ३० | १०२ पै | ०.०२ | १०३ | गावठाण | ११० | १०१ |
| ३१ | ११० पै | ०.०५ | १०९ | गावठाण | १११ | १०२ |
| ३२ | १११ पै | ०.०५ | ११२ | गावठाण | १५३ | ११० |
| ३३ | ११६ पै | ०.०४ | १२७,१३० | सांगवडेवाडी | १०५ | १०० |
| ३४ | १५३ पै | ०.०६ | १५२ | गावठाण | १६१ | १११ |
| ३५ | १५४ पै | ०.०२ | १५२ | गावठाण | १५५ | १५३ |
| ३६ | १५५ पै | ०.०२ | १५२ | गावठाण | १५६ | १५४ |
| ३७ | १५६ पै | ०.०१ | १५२ | गावठाण | १५७ | १५५ |
| | **एकूण** | ४.१४ | | | | |

## अनुसूची - दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**गावाचे नांव- मौजे. सांगवडेवाडी ता.करवीर, जि.कोल्हापूर**

**प्रकल्पाचे नांव: दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प,तालुका –राधानगरी, जिल्हा.कोल्हापूर**

**प्रकल्पाचे कामाचे वर्णन**:- दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प ता.राधानगरी जि.कोल्हापूर हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत दुधगंगा नदीवर आसनगांव ता.राधानगरी येथील १२८० मी. लांबीची(मध्यभागी नदीपात्रात दगडी व दोन्ही तिरावर मातीचे असे संयुक्त) धरण आहे. दुधगंगा धरणाखालील दोन्ही तिरावर कालवे असून सदर कालव्याची लांबी उजवा तीर कालवा २४ कि.मी.व उजवा तीर कालव्याखालील बिद्री शाखा कालवा ४१ कि.मी., निढोरी शाखा कालवा २५ कि.मी., कूर शाखा कालवा १७ कि.मी.,डावा तीर कालवा ७६ कि.मी. डाव्या तीर कालव्याखालील कोल्हापूर शाखा कालवा ३८ किमी व कुरुंदवाड शाखा कालवा ४० कि.मी. इतकी आहे.

सदर धरणामध्ये ७१९.९२ दलघमी इतका पाणीसाठा होत असून त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ६१०३२ हे.(पीकक्षेत्र) व कर्नाटक राज्यातील १२९८५ हे.(पीकक्षेत्र) क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर प्रकल्पास तृतीय प्रशासकीय मान्यता रु.१७१२७९.९० लक्ष दिनांक १५ जुलै २०११ अन्वये मंजूरी

प्राप्त झालेली आहे. आतापर्यंत सदर प्रकल्पास रु.९९६६३.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाची उर्वरित किंमत रु.७१६१६.९० लक्ष इतकी आहे.त्यामुळे सद्यःस्थितीत सदर प्रकल्पास अनुदान उपलब्ध आहे.

**समाजाला होणारे लाभ :-**

(अ) या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये बारमाही पाण्याची सोय झाल्यामुळे नगदी पिके घेणे शक्य होवून लोकांचा आर्थिक व समाजिक स्तर विकसीत झाला असून दिवसोदिवस सदर विकास वाढतच आहे. तसेच या प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील गांवामध्ये पाणीटंचाई दूर झालेली आहे.

(ब) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पीक क्षेत्रामध्ये वाढ झालेली असून त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळालेला आहे.

(क) पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे विविध प्रकारची नगदी पिके घेणे शक्य होवून लाभक्षेत्रातील शेतक-यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते लोक सर्व नागरी सुविधा मिळविण्याबाबत सक्षम झालेले आहेत.

(ड) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ऊसासारखी नगदी पिके घेतल्यामुळे साखर कारखान्यासारखा औद्यौगिक क्षेत्रामध्ये वाढ होवून विकास झालेला आहे.

## अनुसूची – तीन

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

**गावाचे नांव- मौजे. सांगवडेवाडी** ता.करवीर, **जि.कोल्हापूर**

मौजे. **सांगवडेवाडी** ता.करवीर , जि.कोल्हापूर येथील जमीन दूधगंगा डावा कालवा अतर्गत कोल्हापूर शाखा कालवा कि.मी.१३ ते १५ च्या बांधकामासाठी संपादित करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेत जमीन येत असुन,गावठाणे विस्थापित होत नाही. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची – चार

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्या-या अभिकरणाने दिलेला)**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

दुधगंगा हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या सदर प्रकल्पाचा नियत दिनांक २ नोव्हेंबर १९७८ हा आहे. दूधगंगा आंतरराज्य प्रकल्पास मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांचे पत्र क्रमांक G-221/92 FC, दिनांक १६ नोव्हेंबर १९९४ अन्वये तसेच मा.भारत सकरकाच्या पर्यावरण व वन खात्याची त्यांचे पत्र क्रमांक Bo/Bo/Env-5 दिनांक २ जानेवारी

१९८४ अन्वये पर्यावरण व वन खात्याची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर दोन्ही आदेशान्वये अतिरिक्त संचालक मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांचे पत्र क्रमांक १२००११/ संकीर्ण/ A-१, दिनांक ७ फेब्रुवारी २००८ अन्वये मा.भारत सरकारच्या दिनांक २ जानेवारी १९८४ व १६ नोव्हेंबर १९९४ च्या आदेशान्वये पर्यावरण व वनजमिनीस दिलेल्या मान्यतांचे विषद करुन संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रकल्पांस मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर दूधंगगा प्रकल्पांतील प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाहीही पूर्ण झालेली आहे. सदर प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधा अंतर्गत आहे. नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार सदर प्रकल्पास सुधारित S.I.A. करण्याची आवश्यक नाही.

**अनुसूची - पांच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम : लागू नाही

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : प्रश्न उदभवत नाही

क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल. : प्रश्न उदभवत नाही

**टीप - उक्त जमिनीच्या आराखड्याची उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग, कोल्हापूर या कार्यालयात निरीक्षण करता येईल.**

दिनांक : २०/०५/२०१९ /०३/२०१९

ठिकाण : कोल्हापूर

(सचिन इथापे)
उपविभागीय अधिकारी,
करवीर विभाग , कोल्हापूर

उपविभागीय अधिकारी करवीर विभाग, कोल्हापूर सत्यमेव जयते

(दौलत देसाई)
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

मूडशिंगी टिपणी